दै. ~~आज~~ प्रजावाणी दि. 20/01/2025

## लुटमार करणाऱ्या पाच जणांना बेड्या : ८० हजाराचा मुद्देमाल जप्त

# नांदेड शहरात लुटमारीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये दहशत

प्रतिनिधी • नांदेड



### पाच आरोपींना अटक

भाग्यनगर ठाणे हद्दीत अनिल नागडा व प्राध्यापकाला लुटणाऱ्या पाच आरोपींना पोलिसांनी गजाआड केले आहे. आरोपीमध्ये शुभम आनंद राठोड (रा. बजाजनगर), अभय नारायण कांबळे (रा. एकतानगर), आर्यन राहुल परांडे (रा. लोकमित्रनगर) यासह दोन विधीसंघर्षीत बालकांचा समावेश आहे. आरोपीकडून एक सोन्याची अंगठी व नगदी रुपये असा एकूण ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मंदिरामध्ये प्रार्थना करीत बसलेले असताना तिघा जणांनी गळ्याला काठी आवळून सोन्याची अंगठी व रोख रक्कम तसेच पिपल्स कॉलेज परिसरात एका प्राध्यापकाला चाकूचा धाक दाखवत तसेच गालावर चापटा मारून खिशातील रक्कम पळवून नेल्याची घटना शनिवारी (दि.१८) भाग्यनगर पोलीस हद्दीत घडली होती. या दोन्ही गुन्ह्यातील पाच आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले असून अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी दोघेजण विधी संघर्षीत बालक आहेत.

रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना शस्त्राचा धाक दाखवून लुटमार होत असल्याच्या घटनांनी नागरिकांत असुरक्षिततेचे वातावरण पसरले आहे. लागोपाठ होणाऱ्या या घटना पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या असल्यातरी सर्वसामान्य नागरिकांत भीतीचे वातावरण पसरणाऱ्या ठरत आहेत. दोन दिवसात विमानतळ आणि भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत लुटमारीच्या लागोपाठ चार घटना घडल्याने नागरिकांनी घराच्या बाहेर पडावे की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

अनिल हिराचंद नागडा हे साठवर्षीय गृहस्थ यशवंतनगरमधील जागृत हनुमान मंदिरात सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास प्रार्थना करीत बसले होते. त्यांच्या पाठीमागून आलेल्या तिघा जणांनी पिक्चर स्टाईल गळ्याला काठी लावून गळा गच्च केला. अनिल नागडा यांच्या हातातील ७० हजार रुपये किंमत असलेली सोन्याची अंगठी व खिशातील सात हजार रुपये असा एकूण ७७ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल घेऊन पळ काढला.

तसेच पिराजी कोंडीबा कदम हे रात्री दहा वाजताच्या सुमारास कॅनॉल रोडवरील एका दुध डेअरी समोरून जात होते. तेथे आलेल्या दोघा जणांनी 'क्या भाई, क्या कर रहे हो' असे म्हणून कदम यांना पकडले. त्यांच्या खिशातील ३० हजार रुपये किंमतीचा मोबाईल, तीन हजारचा इअर बर्ड असा एकूण ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरीने चोरून नेला आहे.

तर तिसरी घटना पिपल्स कॉलेज रोड परिसरात प्रा. अनंत दादाराव राऊत यांना तिघा जणांनी लुटल्याची घडली. प्रा. राऊत हे घराकडे पायी जात होते. या वेळी त्यांच्या पाठिमागून आलेल्या तिघांनी गालावर चापटा मारून भीती निर्माण करून त्यांच्याकडील साडेतीन हजार रुपये काढून पळ काढला. उपरोक्त तिन्ही घटना भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्या आहेत.

तसेच लुटमारीची चौथी घटना विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. महाराणा प्रताप चौक परिसरात राहणारे शिवहार रामेश्वर स्वामी हे भाजीपाला आणण्यासाठी आनंदनगर रोडवरून जात असताना स्कुटीवरून आलेल्या दोघा जणांनी त्यांना मारहाण करत मोबाईल व नगदी दीड हजार रुपये पळविले. यावेळी स्वामी यांनी बराच प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. परंतु, लुटारु हाती लागले नाहीत. या प्रकरणाच्या गुन्ह्याची नोंद विमानतळ ठआण्यात करण्यात आली आहे.